PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 5, ISSUE 5

# कृषी पर्यटन आणि कृषी व ग्रामीण विकासाची संधी

**डॉ. काशिदे यादव मधुकर**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्री. पंढरीनाथ कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय पोखरी, ता. आंबेगाव,
जि. पुणे ४१०५०९.
**महाराष्ट्र भारत**

**प्रस्तावना** —

अलीकडील कालावधीमध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा चिंतेचा विषय बनला आहे. भारतामध्ये १८३० ते १९०९ या दरम्यानच्या कालावधीमध्ये २२ भीषण दुष्काळ पडले होते. त्यावेळी शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या नाहीत. तसेच ब्रिटीशांच्या १५० वर्षाच्या कालावधीमध्ये जेवढया शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या नाहीत तेवढया शेतकऱ्यांनी मागील २० वर्षामध्ये आत्महत्या केल्या आहेत. मागील २० वर्षामध्ये जवळपास ३ लाख शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. शेतकरी रात्रंदिवस काम करून जेव्हा त्याच्या पिकाला योग्य किंमत मिळत नाही तसेच कधी निसर्गाच्या लहरीपणामुळे येणाऱ्या पिकांवर बघता बघता पाणी सोडावे लागते त्यामुळे शेतकऱ्यांना आत्महत्या करण्याची वेळ येते. त्यामुळे शेतकऱ्यांना उत्पन्न मिळवून देणाऱ्या शाश्वत कृषी पूरक व्यवसायाची गरज आहे. तेव्हा 'कृषी पर्यटन' हा शेतकऱ्याला शाश्वत उत्पन्न मिळवून देणारा कृषी पूरक व्यवसाय महत्वाचा ठरतो. कृषी पर्यटनाचे महत्व लक्षात घेता 'महाराष्ट्र राज्य कृषी पर्यटन विकास महामंडळ' तसेच 'महाराष्ट्र राज्य कृषी व ग्रामीण पर्यटन सहकारी महासंघ' या संस्थांकडून कृषी पर्यटनाला चालना देण्यात येत आहे. तेव्हा कृषी पर्यटन म्हणजे काय? हे जाणून घेणे क्रमप्राप्त ठरते. 'कृषी पर्यटन' म्हणजे कृषी व पर्यटन या दोन विभागाचा समन्वय आहे. याचा अर्थ पर्यटक शेतांना भेटी देतील आणि शेतीच्या विविध पैलूंचे दर्शन व अनुभव घेतील. ''कृषी पर्यटन म्हणजे शेतावर जाऊन राहणे, फिरणे, ग्रामीण संस्कृतीची ओळख करून

घेणे आणि ग्रामीण आदरतिथ्य स्वीकारून मिळालेल्या नवीन ऊर्जेमुळे पुन्हा शहरी जीवनास तोंड देण्यास सिध्द होणे होय.'' कृषी पर्यटनामुळे शहरातील व्यक्ती ग्रामीण भागाशी जोडला जाईल. त्यातून शहरी व ग्रामीण भागामध्ये असलेली वैचारिक दरी कमी होण्यास मदत होईल. कृषी पर्यटनाचे महत्व लक्षात घेता १६ मे हा 'जागतिक कृषी पर्यटन दिन' म्हणून साजरा केला जातो.

भारतात कृषी पर्यटनाची सुरूवात १६ मे २००४ साली महाराष्ट्रातील बारामतीपासून झाली असून आज महाराष्ट्रामध्ये ४१८ कृषी पर्यटन केंद्र कार्यरत आहेत. तर पांडुरंग तावरे यांना कृषी पर्यटनाचे जनक मानले जाते. सन २०१५—१६ या एका वर्षामध्ये २३ लाख पर्यटकांनी कृषी व ग्रामीण पर्यटनाला भेटी दिल्या असून त्यातून ३५.७९ कोटी रूपयाची उलाढाल झाली आहे. त्याचबरोबर ५००० लोकांना कृषी पर्यटनाच्या माध्यमातून रोजगार मिळाला आहे. तसेच गावातील युवक, कारागीर, कलाकार, महिला बचतगट यांना कृषी पर्यटनाचा लाभ झाला आहे. त्याचबरोबर कृषी पर्यटन करणाऱ्या शेतकऱ्यांच्या उत्पन्नात कृषी पर्यटनाच्या माध्यमातून ४० टक्के वाढ झाल्याचे दिसून येते.

थोडक्यात कृषी पर्यटनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नामध्ये निश्चितच वाढ होते. त्याचबरोबर ग्रामीण भागात युवकांना रोजगाराच्या संधी निर्माण होतात. त्यामुळे कृषी पर्यटनाला महत्व प्राप्त होते.

**कृषी पर्यटनाची आवश्यकता** —

पर्यटन म्हणजे पैसा असणाऱ्यांची मौज हा समज आता मागे पडला आहे. सिमेंटच्या जंगलात आणि वाहनांच्या धुराडयामध्ये वावरणाऱ्या लोकांना रोजच्या धकाधकीच्या जीवनापासून मुक्त, शांत, निवांत जीवन जगण्यासाठी आणि ग्रामीण जीवनाची अप्रुप असणाऱ्यांसाठी कृषी पर्यटन उत्तम मार्ग आहे. त्यामुळे शहरी लोकांचा कृषी पर्यटनाकडे ओढा वाढत आहे. तेव्हा लोकांची मागणी लक्षात घेवून उत्तम कृषी पर्यटन केंद्र उभारणे आवश्यक आहे.

चांगल्या कृषी पर्यटन केंद्रासाठी २—५ एकर शेतजमीन असावी. या ठिकाणी एक बाब लक्षात ठेवावी की या जमिनीवर प्रत्यक्ष शेती करावयाची नाही तर शेती सादृश्य परिस्थिती निर्माण करावयाची आहे. उत्तम कृषी पर्यटनासाठी पर्यटकांच्या निवासाच्या सोयीसाठी किमान सहा खोल्या असाव्यात व सभामंडपासाठी एक मोठी खोली असावी. शेतजमीन उच्च—सखल किंवा डोंगराळ असेल तरी सुध्दा त्याचा

कल्पकतेने विचार केला जाऊ शकतो. उपलब्ध शेतजमीनीत थोडया भागात भात शेती, थोडया भागात भाज्या आणि फळ झाडांची लागवड करावी कारण ताज्या कृषी उत्पादनाचा जेवणासाठी वापर करता येईल. त्याचबरोबर कृषी पर्यटनामध्ये मत्स्य शेती, कुक्कुटपालन, दुग्ध व्यवसाय, शेळीपालन सुध्दा करता येते. मात्र या ठिकाणी एक बाब लक्षात ठेवावी की, हे ठिकाण पर्यटकांच्या राहण्याच्या ठिकाणापासून दूर असावे जेणे करून यातून निर्माण होणाऱ्या घाणीचा पर्यटकांना त्रास होणार नाही. तसेच उत्तम कृषी पर्यटनामध्ये कौलारू घर, बैलगाडी, धबधबा किंवा ओहोळ, झरा, तळं, नदी, विहीर, भरपूर झाडे, गावरान खादय पदार्थाची सोय इत्यादी बाबी असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर कृषी पर्यटनाचा विकास होण्यासाठी कृषी पर्यटनाच्या आसपासच्या परिसरात पुढील पायाभूत सुविधांची आवश्यकता असते.

१) वाहतुकीच्या सोयी सुविधा

२) निवास व भोजन सुविधा

३) मनोरंजनाच्या सेवा

४) संपर्क सेवा

५) विविध वस्तूंच्या खरेदीची ठिकाणे

६) चलन विनिमय

७) इतर पूरक सुविधा

  १) प्रमाण परिसर विकास

  २) पाण्याची उपलब्धता

  ३) परिसर मार्गदर्शक सुविधा

**कृषी पर्यटनाचे लाभ** –

१) कृषी पर्यटनाच्या माध्यमातून शहरातील लोक शेतीच्या विविध पैलूचे दर्शन व अनुभव घेतील. प्रदूषणमुक्त वातावरणाचा आनंद घेऊ शकतील. तसेच ताजा

भाजीपाला, फळे खरेदी करू शकतील व विविध लोककलांचा अनुभव घेऊन ताजेतवाने होऊन आपल्या शहराकडे जाऊ शकतील.

२) कृषी पर्यटन हा शेतकऱ्यांच्या व्यवसायाला उत्तम पूरक व्यवसाय असून कृषी पर्यटनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात निश्चितच भर पडते.

३) कृषी पर्यटनाच्या माध्यमातून ग्रामीण नवयुवकांना रोजगाराच्या विविध संधी निर्माण होतात.

४) कृषी पर्यटनामुळे ग्रामीण भागातील युवक, महिला तसेच महिला बचत गटांनी बनविलेल्या पदार्थांना गावातच बाजारपेठ उपलब्ध होते. त्यामुळे ग्रामीण भागातील महिलांना मोठया प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात.

५) कृषी पर्यटनाच्या माध्यमातून शहरातील पैसा ग्रामीण भागात विखुरला जाईल व ग्रामीण भाग स्वंयपूर्ण होईल. त्यातून ग्रामीण भागातील राहणीमान उंचावू शकेल.

६) कृषी पर्यटनाच्या माध्यमातून कृषी उत्पादनाला चांगली बाजारपेठ मिळू शकते.

७) कृषी पर्यटनामुळे घरातील महिलांचे मनुष्यबळ कामाच्या मुख्य प्रवाहात येऊ शकते.

८) कृषी पर्यटनामुळे ग्रामीण भागातील पडीक व गायरान जमिनीचा योग्य वापर होऊ शकतो.

९) कृषी पर्यटनामुळे ग्रामीण माणूस शहराशी जोडला जाईल.

१०) कृषी पर्यटनाच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागातील असलेली वैचारिक दरी कमी होण्यास मदत होईल.

११) कृषी पर्यटनाच्या माध्यमातून शेती व शिवार स्वच्छ राहण्यास मदत होते.

१२) कृषी पर्यटनाच्या माध्यमातून कृषी संस्कृतीचे जतन व संवर्धन होते.

१३) कृषी पर्यटनामुळे शहरातील लोकांना ग्रामीण संस्कृतीसह शेतीची माहिती प्राप्त होते.

**समारोप –**

शहरातील वाहनांच्या धुरात आणि सिमेंटच्या जंगलात वावरणाऱ्या शहरातील लोकांसाठी रोजच्या धकाधकीच्या जीवनापासून मुक्त, शांत,

निवांत जीवन जगण्यासाठी आणि मन:शांतीसाठी कृषी पर्यटन हा उत्तम मार्ग ठरत आहे. म्हणूनच महाराष्ट्रातील ४१८ कृषी पर्यटन केंद्राना सन २०१५–१६ या एका वर्षामध्ये २३ लाख पर्यटकांनी भेटी दिल्याचे दिसून येते. तसेच शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनातून सुध्दा कृषी पर्यटनाला अत्यंत महत्व आहे. सन २०१५–१६ या वर्षामध्ये कृषी पर्यटनाच्या माध्यमातून ३५.७९ कोटी रूपयांची उलाढाल झाली आहे. तर कृषी पर्यटनाचा अवलंब करणाऱ्या शेतकऱ्यांच्या उत्पन्नात कृषी पर्यटनाच्या माध्यमातून ४० टक्के वाढ झाली आहे. तसेच ५ हजार लोकांना रोजगार मिळाला आहे. त्याचबरोबर गावातील युवक, कारागीर, कलाकार, महिला, महिला बचत गट यांना कृषी पर्यटनाचा लाभ झाला आहे. तेव्हा कृषी पर्यटनाच्या विकासासाठी राष्ट्रीयकृत बॅंकामार्फत अधिकाधिक पतसुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. तसेच कृषी पर्यटनाचा प्रसार होण्यासाठी ग्रामीण तरूणांना कृषी पर्यटनाची माहिती मिळवून देणे आवश्यक आहे. त्यासाठी कृषी पर्यटन परिषदेमध्ये ग्रामीण तरूणांचा सहभाग वाढविण्यात यावा.

## संदर्भ सूची –

१) पुरोहित वसुधा (२०१६), ''कृषी अर्थशास्त्र'' शशिकांत पिंपळपुरे, विदया बुक्स पब्लिशर्स औरंगपुरा, औरंगाबाद.

२) www.agritourism.in/blog-post/कृषी–व–ग्रामीण पर्यटन . . . ०८/०९/२०१९

३) https/www.google.com/amp/s/www.loksatta.com/lokshivar -news/agritourism-1 … 08/09/2019.

४) http://prahaar.in/ कृषी–ग्रामीण पर्यटन -2/amp/- 08/09/2019